महाराष्ट्र शासन

क्रमांक- एसएसएन-१०९१/२५८६/माशि-१

शिक्षण व सेवायोजन विभाग,
मंत्रालय विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक- ३० सप्टेंबर, १९९१.

प्रति,

विभागीय शिक्षण उपसंचालक,
मुंबई/नाशिक/पुणे/कोल्हापूर/
औरंगाबाद/नागपूर/अमरावती.

विषय:- १९९१-९२ या शैक्षणिक वर्षात नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्याबाबत...

नवीन माध्यमिक शाळांना परवानगी देण्यावर शासनाने घातलेल्या सर्वसाधारण बंदीला अपवाद करून, सोबतच्या विवरणपत्रात नमूद केलेल्या शैक्षणिक संस्थांना, त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी इयत्ता व माध्यमातून जून, १९९१ पासून विना अनुदान तत्वावर [ इंग्रजी माध्यमाच्या शाळांना कायम विना अनुदान तत्वावर], "विशेष बाब" म्हणून नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास परवानगी देण्यात येत आहे.

सदर संस्थांना अनुदान संहितेनुसार आवश्यक असणाऱ्या सर्व बाबींची तसेच खाली नमूद केलेल्या अटींची पूर्तता करण्याच्या शर्तीवर नवीन माध्यमिक शाळा सुरु करण्यास शासनाची परवानगी देण्यात येत आहे :-

अ] या नवीन माध्यमिक शाळांना [ इंग्रजी माध्यमाव्यतिरिक्त ] शासन निर्णय, शिक्षण व सेवायोजन विभाग, क्रमांक: एसएसएन-१०८८/१६६९-एन/ माशि-२, दि.१०-२-८९ अन्वये विहित केलेल्या नवीन सूत्रानुसार अनुदान अनुज्ञेय होईल.

ब] सदर माध्यमिक शाळांनी शासनाच्या वेळोवेळी निघणाऱ्या आदेशांचे [ उदा. विद्यार्थ्यांच्या प्रवेशाबाबत इ.] काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

क] सदर संस्थेची आर्थिक स्थिती पुरेशी समाधानकारक असणे आवश्यक आहे.

ड] इंग्रजी माध्यमाच्या माध्यमिक शाळांसाठी भविष्यकाळात शासनाकडून कोणत्याही प्रकारे अनुदानाची मागणी करण्यात येणार नाही वा आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या विद्यार्थ्यांसाठी [इ.बी.सी.च्या] फी च्या परताव्याची मागणी करण्यात येणार नाही. अशा आशयाचे संस्थेच्या अध्यक्षांचे सहीचे लेखी हमीपत्र संबंधित विभागीय शिक्षण उपसंचालकांनी मागवून घ्यावे व कायम स्वरुपाचे कागदपत्र म्हणून ते सुरक्षितपणे जतन करुन ठेवावे.

...२-

३. ही परवानगी देण्यापूर्वी प्रत्येक संस्थेबाबत खाली नमूद केलेल्या बाबींची खात्री करुन घेवून मगच त्या संस्थेला नवीन माध्यमिक शाळेची परवानगी देण्याबाबत कार्यवाही करण्यात यावी.

१] संबंधित संस्था, मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० व संस्था नोंदणी अधिनियम १८६० अथवा केवळ मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम, १९५० अन्वये नोंदणीकृत आहे.

२] संस्थेविरुद्ध गैर व्यवहाराच्या तक्रारी नाहीत.

३] सदर संस्थेने चालविलेल्या शाळांपैकी एखाद्या शाळेची मान्यता काढून घेतलेली नाही.

४] संबंधित संस्थेविरुद्ध कोणत्याही प्रकारचे गैरव्यवहार याबत अथवा अनियमितता याबत तक्रारी आलेल्या नाहीत. अशा संस्थेने चालविलेल्या शाळा शासनाने ताब्यात घेण्याबाबत स्वतंत्र प्रकरण प्रलंबित नाही.

४. ज्या संस्थांना परवानगी अंतिम निर्णयानंतर शाळा सुरु करणे शक्य झाले नाही. अशा संस्थांनी १९९२-९३ पासून पुनर्विचारार्थ दिनांक ३१ पूर्वी शासनाकडे अर्ज करणे आवश्यक आहे. असे संबंधित संस्थांच्या परवानगी आदेशात नमूद करावे.

५. याबाबत पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्यात यावी. तसेच सदर माध्यमिक शाळांना द्यावयाच्या परवानगी देण्याबाबतची कार्यवाही पूर्ण करुन त्याबाबत सविस्तर अहवाल शासनास त्वरित पाठविण्यात यावा.

[ ए. ए. [illegible] ]
उप सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रत माहितीसाठी व आवश्यक कार्यवाहीसाठी रवाना:-
शिक्षण संचालक, महाराष्ट्र राज्य, पुणे.
शिक्षणाधिकारी माध्यमिक, जिल्हा परिषद.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. शिक्षण मंत्री यांचे खाजगी सचिव,
मा. शिक्षण राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
सचिव, शिक्षण व सेवायोजन विभाग, यांचे स्वीय सहायक,
निवड नस्ती.

## जिल्हा :- पुणे.

| अ.क्र. | संस्थेचे नांव | शाळेचे ठिकाण व तालुका | इयत्ता | माध्यम |
|---|---|---|---|---|
| १. | २. | ३. | ४. | ५. |
| ०१. | श्री.म्हसोबा शिक्षण प्रसारक मंडळ, निमगाव म्हाळुंगे, ता.शिरुर | सदरवाडी, ता.शिरुर | आठवी | मराठी |
| ०२. | -"- -"- | निरवी, ता.शिरुर | आठवी | मराठी |
| ०३. | छत्रपती शिक्षण संस्था, भवानीनगर, ता.इंदापूर | बेलवाडी, ता.इंदापूर | आठवी | मराठी |
| ०४. | आर्यसमाज सोसायटी, पुणे- १७ | पिंपरी, पुणे-१७ | आठवी | इंग्रजी |
| ०५ | अमरज्योती तरुण मंडळ शिक्षण संस्था, भोसरी, पुणे | लांडेवाडी, भोसरी, पुणे | आठवी | मराठी |
| ०६ | आदिवासी शिक्षण प्रसारक मंडळ, घोटवडी, ता.खेड. | देवोशी, ता.खेड | आठवी | मराठी |
| ०७ | सिम्बॉयसिस इंटरनॅशनल कल्चर ॲन्ड एज्यु.सेंटर, पुणे | सर्व्हे नं.१५, प्रभात रोड, पुणे-४ | आठवी | इंग्रजी |
| ०८ | कर्मवीर शिक्षण संस्था, रुई | रुई, ता.इंदापूर | आठवी | मराठी |
| ०९ | कै. मामासाहेब मोहोळ शिक्षण संस्था | कोयाळी, ता.खेड | आठवी | मराठी |
| १०. | रयत शिक्षण संस्था, सातारा | जांभोरी, ता.आंबेगाव | आठवी | मराठी |
| ११. | हिंगणे स्त्री शिक्षण संस्था पुणे. | खडकवासला, ता.हवेली | आठवी | मराठी |



Symbiosis Schools *Pune-4*

TRUE COPY

REGISTRAR
Symbiosis Schools